# स्नेहालय शाळेत राष्ट्रीय गणित दिवस साजरा

**अहिल्यानगर (प्रतिनिधी) –** एमआयडिसी येथील स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शाळेचे मानद संचालक राजेंद्र शुक्रे, अनिवासी प्रकल्पाचे संचालक हनीफ शेख यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय गणित दिवस (२२ डिसेंबर) उत्साहात साजरा करण्यात आला.



मुख्याध्यापिका वीणा मुंगी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. या कार्यक्रमात एलकेजी ते इयत्ता दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी गणिताशी संबंधित विविध कृतीपूर्ण उपक्रम सादर केले. संख्या, संख्याज्ञान, चढता उतरता क्रम, अपूर्णांक, बेरीज, वजाबाकी, गणितीय जादू, मोजणी पद्धती, बीजगणित, भूमिती या विषयावर आधारित विविध उपक्रम घेण्यात आले. शिक्षक उंडे यांनी उपक्रमांची तपासणी केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अनिल गावडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जाती-जातींमध्ये विद्वेष तयार करण्याचे राहुल गांधींचे ध्येय- फडणवीस

**पुणे (प्रतिनिधी)–** राहुल गांधी यांनी परभणीला केवळ राजकीय हेतूने आले होते. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना दिलेली भेट ही केवळ राजकीय भेट आहे. लोकांमध्ये, जाती जातींमध्ये विद्वेश तयार करायचा एवढे एकमेव ध्येय राहुल गांधी यांचे आहे. तेच काम गेल्या अनेक वर्ष ते सातत्याने करत आहेत. त्यामुळे मला असं वाटतं की त्यांनी हे जे काही विद्वेषाचे त्यांचं काम आहे हे त्यांनी त्या ठिकाणी जाऊन पूर्ण केलेलं आहे अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या परभणी भेटीवर केली.

फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राचे सरकार संवेदनशील असल्यामुळेच परभणीत घडलेल्या संपूर्ण प्रकरणाची आम्ही न्यायालयीन चौकशी ही घोषित केलेली आहे. न्यायालयीन चौकशीमध्ये या संदर्भातलं सगळं सत्य आणि तथ्य बाहेर येईल. काहीही लपवण्याचा कारण नाहीये आणि जर त्या चौकशीमध्ये कुठल्याही प्रकारे मारहाणीमध्ये किंवा अशा प्रकारच्या गोष्टींमुळे हा मृत्यू झालाय असं बाहेर आलं तर कोणालाही सोडलं जाणार नाही. कठोरात कठोर अशा प्रकारची कारवाई केली जाईल. दरम्यान, जेष्ठ नेते शरद पवारही त्याठिकाणी गेले होते याबाबत विचारले असता फडणवीस म्हणाले, पवार साहेबांनी मला एवढंच सांगितलं की या दोन्ही ठिकाणी तुम्ही लक्ष घाला. त्यांना सांगितलं मी पूर्ण लक्ष घातलेलं आहे.

**पालकमंत्रीपदाबाबत कुठलीही रस्सीखेच नाही**

आमचे जे काही तीन पक्षाचे नेते आहेत ज्यांना आम्ही जबाबदारी दिलेली आहे. ते एकत्रित बसतील आणि पुढच्या दोन-तीन दिवसात पालकमंत्री पदाबाबतची प्रक्रिया पूर्ण करतील असे सांगत पालकमंत्रीपदाबाबत कुठलीही रस्सीखेच नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**भुजबळ साहेबांसारखा एक नेता हा आमच्यासोबत मैदानात असला पाहिजे**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांची मंत्रीपदी वर्णी न लागल्याने ते नाराज आहेत. त्यातच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याने अनेक तर्क वितर्क वर्तविले जात आहेत. याबाबत विचारले असता फडणवीस म्हणाले, माझी भेट झाल्यानंतर भुजबळ साहेबांनी तुम्हाला सर्व सांगितले आहे. त्यामुळे आमची काय चर्चा झाली हे पुन्हा एकदा सविस्तर सांगण्याची आवश्यकता नाही.

भुजबळ साहेब आमच्या महायुतीचे प्रमुख नेते आहेत आणि तिन्ही पक्ष मग ते अर्थातच राष्ट्रवादीचे नेते आहेत म्हणून तिथे त्यांचा सन्मान आहेच. आमच्या तिन्ही पक्षाच्या नेत्यांच्या मनात त्यांच्याबद्दल सन्मानाची भावना आहे. महायुतीच्या विजयामध्ये त्यांचा देखील एक महत्त्वाचा वाटा राहिलेला आहे आणि स्वतः अजितदादा देखील त्यांची चिंता करतात.

मुळातच भुजबळ साहेबांना ज्यावेळेस अजितदादांनी मंत्रिमंडळामध्ये घेतलं नाही त्यावेळी भुजबळ साहेबांना डावलण्याचा त्यांचा हेतू नव्हता. त्यांनी मला सांगितलं की आमची इच्छा आहे की आमचा पक्ष हा राष्ट्रीय पक्ष राहिलेला आहे आम्हाला तो राष्ट्रीय स्तरावर मोठा करायचा आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर भुजबळ साहेबांसारखा एक नेता ज्याला देशाच्या अन्य राज्यातही मान्यता आहे त्यांना आम्हाला राष्ट्रीय पातळीवर पाठवायचं आहे. भुजबळ साहेबांचे मत जरा वेगळं होतं त्याच्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. पण आम्ही सगळे मिळून याच्यावर तोडगा काढू आणि भुजबळ साहेबांसारखा एक नेता हा आमच्यासोबत मैदानात असला पाहिजे या दृष्टीने त्यांना मार्ग काढला जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

भुजबळ यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चेबद्दल विचारले असता फडणवीस म्हणाले, त्यांनी अशी कुठलीही मागणी केली नाही अथवा असा कुठलाही विषय आमच्या समोर आलेला नाही. शेवटी राष्ट्रवादी काँग्रेस आम्ही आणि शिवसेना एकत्रित आहोत ना? त्यामुळे आम्ही कशाला असे करू? अशा प्रकारची काही भावनाच नाही. आम्ही एकत्रित आहोत आणि निर्णय एकत्रितपणे करायचे आहेत. त्यांच्याबद्दल तिन्ही पक्षांमध्ये आदर आहे.

**कुठल्याही प्रकारची निदर्शने करणे योग्य नाही**

बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रत्येक कार्यक्रमात निदर्शने करण्याचा आणि धनंजय मुंडे यांचे मंत्रिपद काढून घेण्याची मागणी केली जात आहे याबाबत विचारले असता फडणवीस म्हणाले, आता बीडच्या प्रकरणाची सगळी चौकशी चाललेली आहे. ती चौकशी दोन्ही प्रकाराने आपण करतो आहे आणि मी स्पष्टपणे सांगितला आहे की, चौकशीमध्ये कोणीही दोषी आढळला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल . त्यामुळे कुठल्याही प्रकारची निदर्शना करणे हे काही योग्य होणार नाही.

## पान १ वरुन

## महाराष्ट्रात यंदा २० लाख घरं देणार

१३ लाख २९ हजार ६७८ पक्की घरे देण्यात येतील. सर्व मिळून एकूण १९ लाख ६६ हजार ७६७ घरे देण्याची घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कार्यक्रमात आज केली. यामुळे महाराष्ट्र देशातील सर्वात जास्त पक्की घरे निर्माण करणारे राज्य ठरेल. असे त्यांनी यावेळी सांगितले. या संदर्भातील पत्र केंद्रीय कृषीमंत्री चौहान यांनी मुख्यमंत्री फडवणीस यांना कार्यक्रमाप्रसंगी दिले.

ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. केंद्र सरकारने देशातील शेतकरी केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांचे जीवनमान बदलण्यासाठी व त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यासाठी विविध नवीन योजना सुरू केल्या आहेत. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या संस्थांतर्गत कर्जात पूर्वीच्या तुलनेत मोठी वाढ झाली असून ७ लाख कोटी रुपयांपरुन २५ लाख कोटी रुपये पीक कर्ज मिळत आहे. देशाच्या अर्थसंकल्पात कृषी विभागाच्या तरतुदीत १ लाख २७ हजार कोटी रुपये इतकी मोठी वाढ करण्यात आली आहे. गेल्या दोन वर्षात अन्न धान्याच्या किमान आधारभूत किंमतीत दुप्पट वाढ करण्यात आली असून मोठया प्रमाणात खरेदी देखील करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळणे आवश्यक असून रासायनिक खतांचा वापर कमी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

**कृषी क्षेत्रात शाश्वतता आणण्याकरिता कृषी आणि विज्ञानाची सांगड घालणे महत्त्वाचे– देवेंद्र फडणवीस**

कृषी क्षेत्रात शाश्वतता आणण्याकरिता कृषी आणि विज्ञानाची सांगड घालणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कृषीमधील पारंपरिक विज्ञानदेखील अत्यंत महत्त्वाचे आहे. आज पुन्हा संपूर्ण जग नैसर्गिक शेतीकडे वळताना दिसत आहे. नैसर्गिक बाबींचा वापर अधिकाधिक करुन उत्पादकता कशी वाढवता येईल तसेच खाद्यामध्ये विषयुक्त पदार्थांचा वापर कसा कमी करता येईल याचा प्रयत्न सुरू आहे. महाराष्ट्राने देखील नैसर्गिक शेतीचे अभियान स्वीकारले असून २५ लाख हेक्टर शेती नैसर्गिक शेतीखाली आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांना शेतीत प्रयोगशील रहावे लागेल. शेतीचे क्षेत्र कमी झाले असल्याने उत्पादकता वाढवून शेती फायद्याची कशी करता येईल हा प्रयत्न करावा लागेल. यामुळे पर ड्रॉप मोअर क्रॉपफ्योजनेपासून वेगवेगळ्या योजना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आणल्या. आता त्यांनी ड्रोन दीदीची संकल्पना आणली आहे. अशा प्रकारे शेतीमध्ये परीवर्तन होत आहे.

शेती क्षेत्रात शेतमजूर मिळण्याची संख्या कमी होत असल्यामुळे यांत्रिकीकरण अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. मात्र हे यांत्रिकीकरण छोट्या शेतकऱ्यांना परवडणे गरजेचे आहे. त्यामुळे मागील काळात गट शेती, सामुहिक औजारांची बँक सुरू केली. राज्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेंतर्गत विदर्भ आणि मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात शेततळी, यांत्रिकीकरण आदी मदत करण्याचा प्रयत्न केला. तसेच मागेल त्याला शेततळे अशा प्रकारचा कार्यक्रम आखून त्या माध्यमातून शाश्वत सिंचन देण्याचा प्रयत्न आहे, असेही फडणवीस म्हणाले.

राज्य शासनाने मॅग्नेट सारख्या योजना आणल्या आहेत. गावातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना कृषी व्यवसाय संस्थांमध्ये (ग्रो बिझनेस सोसायटी) रुपांतरीत करण्याचे काम सुरू केले आहे. दहा हजार गावांमध्ये हे काम सुरू आहे. या संस्था शेतकऱ्यांची बाजारपेठेसोबत मूल्यसाखळी निर्माण करण्याचे काम करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळून ग्राहकालाही योग्य दरात शेतमाल मिळणार आहे. केंद्र शासन तसेच राज्य शासनाने ई-मार्केट, डिजिटल मार्केट उपलब्ध करुन दिले आहे.

## साई संस्थानची गुंतवणूक ३ हजार कोटींच्या घरात!

भोजन प्रसाद, लाडू प्रसाद, निवास व्यवस्था उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांची संख्या वाढती आहे. यातून स्थानिक अर्थकारण फिरतेच, शिवाय संस्थानच्या उत्पन्नातही मोठी भर पडताना दिसत आहे. साई संस्थानच्या लेखापरीक्षण अहवालानुसार, दि. ३१ मार्च २०२४ अखेर संस्थानच्या राष्ट्रीयकृत बँकेत ठेवी स्वरुपात २९१६ कोटींची रक्कम गुंतवणूक केलेली आहे. तर एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या आर्थिक वर्षात साईंच्या दक्षिणा पेटीत १७६ कोटींचे दान साईभक्तांनी टाकले आहे. सर्वसाधारण देणगी १२१ कोटींची प्राप्त झाली आहे. सोने, चांदी व मौलवान खडे ११ कोटींचे दान साई तिजोरीत मिळाले आहेत. अन्नदान निधी म्हणून ९६ कोटी, रुग्णालयासाठी ५४ कोटी, प्रसादालयासाठी ४६ कोटी, इमारत देखभाल दुरुस्तीसाठी ३२ कोटी, वस्तु स्वरुपात ८ कोटी, इतर असे एकूण ८१९ कोटी रुपयांचे उत्पन्न साई संस्थानला मिळाले आहे. यामध्ये २९१६ कोटींच्या गुंतवणुकीवरील २०० कोटींच्या व्याजाचाही समावेश आहे. एकूण, साईभक्तांच्या दातृत्वामुळे संस्थानला शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांना वेगवेगळ्या सोयीसुविधा पुरवणे शक्य होत आहे. येणाऱ्या काळात आणखी सुविधा पुरविण्यावर संस्थान भर देणार असल्याचे चित्र आहे. साईभक्तांच्या सोयीसुविधांसाठीच्या कामांकरिता शिर्डी नगरपरिषदेला साईंच्या उत्पन्नातून काही रक्कम देण्यात आलेली आहे. तसेच नियोजित शैक्षणिक संकुल प्रकल्पातील इमारतींचे फर्निचर वर्कचे काम प्रगतीपथावर आहे. संस्थान मालकीचे २४ प्लॉट आहेत. त्यांना संरक्षक कंपाऊंड केले जात आहे. संस्थान कर्मचाऱ्यांसाठी वाहन पार्किंग उभारली जात आहे. लाडू व बुंदी प्रोसेसिंगचे २० कोटींचे युनीट उभारले जाणार आहे. नवीन भांडार इमारतीसाठी ११ कोटी मंजूर झाले आहेत.लेखाशाखा विभागाचे स्टॉग़रुम बांधली जाणार आहे, जलवाहिनी, काही इमारती व कॅन्टीनचे नूतनीकरण, लॉन्ड्री युनिट उभारणी, साईनाथ रुग्णालयासाठी केसपेपर इमारत उभारणे, यासह १६ प्रकल्प प्रस्तावित आहे. आतापर्यंत साईभक्तांसाठी सेवेसाठी एकूण उत्पन्नातून संस्थानने ४८९ कोटींचा खर्च केल्याचे अहवालातून पुढे आले आहे.

## ५वी-८वीत नापास होणाऱ्या मुलांना पुढच्या वर्गात ढकलणार नाही

नापास झाले तर त्यांना वरच्या वर्गात जाण्याची द्वार बंद केले जाणार आहे. मात्र तरीही आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शाळेतून काढणार नाही, असेही सरकारने म्हटले आहे.

**इयत्ता ५ आणि ८ च्या विद्यार्थ्यांवर काय परिणाम**

नवीन शैक्षणिक धोरणाने विद्यार्थ्यांची शिकण्याची क्षमता वाढविणे आणि त्यांचा अकॅडमिक परफॉर्मेस सुधारण्याचा उद्देश्य आहे. शिक्षण मंत्रालयाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी ही 'नो डिटेंशन पॉलिसी' समाप्त करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या पॉलीसीवर खूप काळापासून चर्चा सुरु होती. परंतू आता नव्या व्यवस्थेनुसार पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना वार्षिक परिक्षेत अयशस्वी विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात थेट ढकलणे बंद होणार आहे.

**दोन महिन्यात पुन्हा परीक्षेची संधी**

नव्या शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता ५ आणि ८ च्या अयशस्वी विद्यार्थ्यांना दोन महिन्यात पुन्हा परीक्षा देण्याची संधी मिळणार आहे. परंतू ते जर पुन्हा अपयशी झाले तर त्यांना वरच्या वर्गात प्रमोट करणे बंद केले जाणार आहे. परंतू सरकारने हे देखील स्पष्ट केले आहे की आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शाळेतून काढले जाणार नाही.

**यासाठी घेतला निर्णय**

हा निर्णय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी घेतलेला आहे. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठीच ही पॉलीसी आणण्यात आलेली आहे. त्यामुळे शिक्षण मंत्रालयाने इयत्ता पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांच्यावर लक्ष केंद्रीत केलेले आहे. कारण या इयत्तेतील शिक्षणाला पायाभूत शिक्षणासाठी महत्वाचे मानले जात आहे. या नवीन धोरणाने विद्यार्थी आणि शिक्षक या दोघांनाही शिक्षणाप्रती जबाबदार बनविण्याचा प्रयत्न केल्याचे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार यांनी म्हटले आहे.

## दिशा समितीच्या बैठकीत 'जलजीवन'च्या कामाचे वाभाडे!

यंत्रणेची यश लोकांसमोर मांडले जात नाही. केवळ तक्रारी मांडल्या जात आहेत. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे कार्यकारी अभियंता श्रीधर गडधे यांनी योजनांची माहिती दिली. विश्वकर्मा योजनेसाठी जिल्ह्यात १ लाख २० हजार नोंदणी झाली असून ६ हजार ६१० उमेदवारांना प्रशिक्षण दिले जात असल्याची माहिती सभागृहात देण्यात आली. त्यावर खा. लंके यांनी तालुकानिहाय या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मेळावे घेण्याचे निर्देश दिले. पीक विम्याची रक्कम शेतकऱ्याला मिळाल्यास बँक कर्जापोटी कपात करत असल्याकडे ही खा. लंके यांनी लक्ष वेधले. खा. वाकचौरे यांनी ही रक्कम थेट शेतकऱ्यांना द्यावी, असे प्रशासनाला निर्देश दिले.

## अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला पूजा खेडकर हिला अटक होणार

दिला. तसेच पूजा खेडकर हिने वेगवेगळ्या नावाने यूपीएससीची १२ वेळा परीक्षा दिली. यूपीएससीमध्ये फक्त नऊ संधी असतात. तसेच पूजा खेडकर हिने स्वत:चे नाव नाही तर वडिलांचे नावसुद्धा बदलले. तिचे वडील आयएएस असताना क्रिम लेअरचा लाभ घेतला. तिने अपंगत्वाचा खोटा दाखला मिळवला, असे अनेक प्रकार तिचे समोर आले.

## एमपीएससी विद्यार्थ्यांच्या कमाल वयोमर्यादेत वाढ

करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पदसंख्या व आरक्षण नमूद करून मागणीपत्रे सुधारित करण्याची कार्यवाही आवश्यक आहे. याकरिता सुधारित मागणीपत्रानुसार जाहिराती प्रसिद्ध करण्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २०२४ च्या नियोजित वेळापत्रकापेक्षा साधारणतः ९ ते १० महिने विलंब झाला. त्यामुळे राज्यातील अनेक उमेदवारांनी शासन सेवेतील प्रवेशाची विहित कमाल वयोमर्यादा ओलांडली असल्याने असे उमेदवार परीक्षेसाठी अर्ज करण्यास अपात्र ठरत आहेत. यानुषंगाने कमाल वयोमर्यादेत शिथिलता देण्याबाबत शासन निर्णय घेण्यात आला.

**यांना मिळणार लाभ**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ०१ जानेवारी २०२४ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत पदभरतीसाठी ज्या जाहिराती नव्याने प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत आणि त्या जाहिरातींच्या निवड प्रक्रियेचा कोणताही टप्पा पार पडलेला नाही, अशा जाहिरातीकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांना सामान्य प्रशासन विभागाच्या २५ एप्रिल २०१६ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत एक वर्ष इतकी शिथिलता देण्यात आली आहे.

## भुजबळ-फडणवीस भेट

भुजबळांची नाराजी हा पक्षांतर्गत विषय असल्याचं अजित पवारांनी सांगितलय.

**छगन भुजबळांना डावलण्याचा हेतू नव्हता– फडणवीस**

छगन भुजबळांना राष्ट्रीय पातळीवर पाठवण्याचा अजितदादांचा हेतू होता असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. भुजबळांच्या नाराजी बद्दल बोलायचं नाही पण त्यांना मंत्रिपद नाही दिलं ही वस्तुस्थिती असल्याचं खासदार सुप्रिया सुळेंनी म्हटलंय. संघर्षाचा काळ असो की आनंदाची स्थिती भुजबळ साहेब नेहमीच शरद पवारांसोबत राहिले असं म्हणत सुप्रिया सुळेंनी जुन्या आठवणींना उजाळा दिलाय.

# लैंगिक अत्याचारप्रकरणी संस्थाचालकाला अटक

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यातील कर्वेनगर भागातील एका नामांकित शाळेतील नृत्यशिक्षकाने लहान मुलांवर केलेल्या लैंगिक अत्याचारप्रकरणी पोलिसांनी संस्थाचालकाला अटक केली आहे. अन्वित सुधीर फाटक असे या संस्थाचालकाचे नाव आहे.

मंगेश साळवे असं अत्याचार करणाऱ्या नृत्य शिक्षकाचं नाव आहे. याबाबत पुण्यातील वारजे पोलीस ठाण्यात बुधवारी गुन्हा दाखल करत शिक्षकाला पोलिसांनी तत्काळ अटक केली. न्यायालयाने त्याला २२ डिसेंबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. आरोपी नृत्य शिक्षक पहिली ते पाचवी इयत्ता मधील मुला-मुलींना नृत्याचे शिक्षण देतो. सहावी इयत्तेपासून पुढील विद्यार्थ्यांना आठवड्यातून चार दिवस अतिरिक्त क्लास घेऊन शाळेच्या आवारात नृत्य शिकवतो. या शाळेत समुपदेशक विद्यार्थी-विद्यार्थिनींना गुड टच बॅड टचफ ची बाबत माहिती देत असतात त्यातून ११ वर्षीय पीडित मुलाने १७ डिसेंबर रोजी आरोपी शिक्षकाने आपल्याला वाईट स्पर्श केल्याचे समुदेशकांना सांगितले. नृत्यशिक्षकाने लहान मुलांवर लैंगिक व्हिडिओ दाखवून त्यांच्यावर अत्याचार केले. मुलांवर अत्याचार करतानाचे त्याचे मोबाईलमध्ये रेकॉर्डिंग करुन ती इतर लोकांना पाठविण्याची धमकी दिली. तसेच मुलाला शपथ देऊन मारण्याची धमकी दिली. हा प्रकार नोव्हेंबर पासून १४ डिसेंबर पर्यंत सुरु असल्याचे समोर आले आहे.

पीडित मुलाच्या आई वडिलांनी तत्काळ पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी घटनेचं गांभीर्य ओळखत तत्काळ गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आरोपी शिक्षक मंगेश साळवे याला अटक केली. यापूर्वी सुद्धा त्यानं इतर विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचार केल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. शिक्षकानं मुलावर लैंगिक अत्याचार केल्याची माहिती मिळताच पालकांकडून शाळेच्या बाहेर आंदोलन देखील करण्यात आले. आरोपी शिक्षकावर आणखी तीन मुलावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या शिक्षकानं आणखीही विद्यार्थ्यांवर अत्याचार केल्याचा संशय व्यक्त केला जात असून त्याबाबत पोलीस तपास करत आहेत. याबाबत पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी सांगितले की, या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत नृत्यशिक्षकाला कालच अटक केली होती. या घटनेत निष्काळजीपणा दाखविल्याने संस्थाचालक अन्वित फाटक याला अटक केली आहे.

दरम्यान, या शाळेमध्ये समुपदेशादरमयान आणखी काही लहान मुलांवर अत्याचार झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्याबाबतही तपास करावा, अशी मागणी पालकांच्या शिष्टमंडळाने पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना भेट देऊन केली. या प्रकारात शाळा प्रशासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे संस्थाचालक अन्वित पाठक व ट्रस्टी तेवढेच जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.

शाळेत मुलांचे गुड टच, बॅड टच चे समुपदेशन होत नाही. पालक व शिक्षकांच्या बैठका वेळेवर होत नाही. शिक्षकांचे कॅरेक्टर सर्टिफिकेट तपासले जात नाही. संस्थेचे प्रशासन याबाबत गांभिर्याने पहात नाही. त्यामुळे या घटना घडत असल्याचे पालकांनी पोलीस आयुक्तांच्या निदर्शनास आणले.

# डाऊच बुद्रुकच्या उपसरपंचपदी ढमाले बिनविरोध

**घारी (वार्ताहर)–** कोपरगाव तालुक्यातील डाऊच बुद्रुक ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी आ. आशुतोष काळे गटाच्या उषाताई संजय ढमाले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारभार चालू असलेल्या या ग्रामपंचायतीमध्ये दिनेश गायकवाड हे सरपंच असून भिवराव दहे हे उपसरपंच म्हणून काम पाहत होते. उर्वरित सदस्यांना उपसरपंच पदाची संधी मिळावी या हेतूने आपण आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे भिवराव दहे यांनी यावेळी सांगितले. त्यामुळे रिक्त झालेल्या या जागेवर उषाताई ढमाले यांना संधी मिळाली. त्यांच्या या निवडीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. यावेळी ग्रामस्थांच्यावतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी सरपंच दिनेश गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य पल्लवी गायकवाड, स्वाती दहे, अक्षय माळी, विठाबाई माळी, शिवाजी दहे, जगन्नाथ होन, सर्जेराव ढमाले, काशिनाथ दहे, धर्मा दहे, वाल्मीक दहे, प्रदीप ढमाले, वसंत दहे, द्वारकानाथ दहे, बाबासाहेब होन, बाजीराव होन, रामभाऊ जाधव, केशव ढमाले, बाळासाहेब दहे, अशोक ढमाले, संजय ढमाले, दगू गायकवाड, अक्षय दहे, मन्सालाल दहे, संतोष ढमाले, सागर ढमाले, सतीश ढमाले, जगदीश ढमाले, दीपक ढमाले, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्यासह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व भिवराव दहे यांच्या नेतृत्वात गावच्या विकासासाठी तसेच महिला व बालकल्याणाच्या दृष्टीने प्रयत्नशील राहून जास्तीत जास्त कामे करण्याचा मानस आहे. मिळालेली संधी व माझ्यावर ठेवलेला विश्वास हा माझ्या कामातून मी सार्थ ठरविल, असे आश्वासन नूतन उपसरपंच उषाताई ढमाले यांनी दिले.

# राहुरी खुर्द येथे एकास मारहाण

**राहुरी (प्रतिनिधी)–** तोंडाला रुमाल बांधून आलेल्या दोघा जणांनी राजेंद्र परदेशी यांना लाथा बुक्क्यांनी व लोखंडी रॉडने मारहाण करुन हातपाय तोडण्याची धमकी दिल्याची घटना राहुरी खुर्द येथे घडली आहे.

राजेंद्र आनंद परदेशी (वय ३४) रा. राहुरी खुर्द यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, राजेंद्र परदेशी हे राहुरी खुर्द येथील आयसीआयसीआय बँक शेजारी असताना दोन अनोळखी इसम तोंडाला रुमाल बांधून आले व परदेशी नाव विचारून शिवीगाळ करायला सुरुवात केली. तेव्हा परदेशी त्यांना म्हणाले की, तुम्ही मला विनाकारण शिवीगाळ करु नका. असे म्हणाल्याचा त्यांना राग आल्याने त्यांनी परदेशी यांना लाथा बुक्क्यांनी व लोखंडी रॉडने बेदम मारहाण करून जखमी केले. तसेच तू पुन्हा बस स्टॅण्डवर दिसला तर तुझे हात पाय तोडु, अशी धमकी देऊन परदेशी यांच्या अंगावरील कपडे फाडले. सदर भांडणात परदेशी यांचा मोबाईल गहाळ झाला आहे. त्यानंतर राजेंद्र आनंद परदेशी यांनी राहुरी व अहिल्यानगर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्या फिर्यादीवरून दोन अनोळखी इसमांवर गु.र.नं. १२९१/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), ३२४(१), ३२४ (२), ३५१ (२), ३५१ (३), ३५२ प्रमाणे मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अल्पवयीन मुलीला पळविले

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** शहरातील एका अल्पवयीन मुलीला पळवून नेण्याचा प्रकार घडला आहे.

याप्रकरणी मुलीच्या वडिलांनी पोलिसांत फिर्याद दिली असून त्यात म्हटले आहे की, नेहमीप्रमाणे आपण रात्री ११ पर्यंत टिव्ही पाहत होतो. त्यानंतर आपण झोपी गेलो. मुलगी ही झोपलेली होती. पहाटे ४.१५ ला आपली पत्नी उठली असता मुलगी झोपलेल्या जागेवर दिसली नाही. त्यामुळे मी व पत्नीने मुलीला घरात, घराच्या बाहेर पाहीले मात्र, ती आढळली नाही. यावेळी आमच्या घराचा दरवाजाही उघडा दिसला. त्यामुळे कोणीतरी आपल्या मुलीला कोणते तरी आमीष दाखवून, फूस लावून पळवून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.